C-7

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या १४ विकास कामांच्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

मा. ना. श्री. कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक २० जुलै,२०२३ च्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत १४ विकास कामांना मंजुरी देऊन रक्कम रु. १.४० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली असून सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे यांनी मा. राज्य मंत्री महोदयांनी प्रस्तावित केलेल्या १४ विकास कामांना निधी देणेकामी शासन निर्णयातील अटी शर्तीची पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव २०२३-२४ या वर्षाकरीत सादर करणेकामी क्र. सआसकठाणे/अजाउ/लो.अ.स.ना.व./प्रस्ताव/२०२३-२४ ठाणे/२७६८ दिनांक २०/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस कळविले आहे. त्या अनुषंगाने खालील नमुद १४ विकास कामे शासन निर्णयानुसार अटी व शर्तीची पुर्तता पूर्ण करीत असून रु. १,३९,८६,७५६/- अंदाजपत्रकीय रक्कमचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावांस मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठवावयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १७ श्रमीक नगर, पकुळचाळ येथे गटार व पायवाट करणे. | ९,९८,९५७/- |
| २ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १७ मधील सोनारपाडा व गायत्रीनगर येथे गटार व पायवाट करणे. | ९,९९,९७४/- |
| ३ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र.१७ मधील वॉटर सप्लाय कंपाऊंड बौद्ध मंदिर जवळ गटार व पायवाट करणे. | ९,९९,३००/- |
| ४ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १६ फुलेनगर २ मधील साईनाथ गायकवाड यांच्या घरालगत गटार व पायवाट करणे. | ९,९७,८७०/- |
| ५ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १६ प्रेमनगर येथे गटार व पायवाट करणे. | ९,९९,६९४/- |
| ६ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १३ टेमघर पाईप लाईन, आंबेडकर चाळ मागे वस्तीमध्ये गटार व पायवाट करणे. | ९,९८,९१२/- |
| ७ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील प्रभाग समिती क्र. २ मधील वॉर्ड क्र. १४ गोविंद नगर मधील परिसरात गटार व पायवाट करणे. | ९,९८,९१२/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १ कोंबडपाडा, समतानगर येथे गटार व पायवाट करणे. | ९,९८,९१२/- |
| ९ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र.२० साठे नगर येथे गटार व पायवाट करणे. | ९,९८,७१७/- |
| १० | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वॉर्ड क्र. १ कोंबडपाडा, संगमपाडा, संजय गांधी नगर झोपडपट्टी येथील परिसरात आसन व्यवस्था करणे. | ९,९८,९३१/- |
| ११ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वार्ड क्र. १ कोंबडपाडा, संगमपाडा, संजयगांधी नगर झोपडपट्टी परिसरात आर.सी.सी.चेंबर बसविणे. | ९,९९,०५८/- |
| १२ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वार्ड क्र. ३ नागाव, गायत्रीनगर येथे गटर व पायवाट करणे. | ९,९९,८०४/- |
| १३ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वार्ड क्र. ३ नागाव, गायत्रीनगर येथील परिसरात आर.सी.सी.चेंबर बसविणे. | ९,९९,०५८/- |
| १४ | भिवंडी नि. श. मनपा हद्दीतील वार्ड क्र. ५ मधील खडकरोड येथे गटर व पायवाट करणे. | ९,९८,६५७/- |
| | **एकुण** | **१,३९,८६,७५६/-** |

**ठराव क्र** - 209

**दिनांक**- 23/11 /**२०२३**

मा. ना. श्री. कपिल मोरेश्वर पाटील, राज्य मंत्री, पंचायत राज मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२० जुलै, २०२३ च्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेली १४ विकास कामे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या निकषात बसत असून व कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम.सी.ओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त नमूद १४ प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मान्यते करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. श. महानगरपालिका,भिवंडी**

oh

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी
## विद्युत विभाग

**विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात पी.एम.ई बससेवा योजना राबविणेकामी बसडेपो करिता इन्फ्रास्ट्रक्चर वीज पुरवठा करिता इन्फ्रास्ट्रक्चर (Behind the meter power Infrastructure) बाबतची अंदाजपत्रके शासनास सादर करण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

केंद्रशासनाच्या गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय अर्तंगत पी.एम. ई बस सेवा प्रकल्पा अतंर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेला १०० इलेक्ट्रिक बसेस मंजूर करण्यात आलेल्या आहेत. वरिल संदर्भान्वये सदर प्रकल्पा अतंर्गत बसडेपो करिता इन्फ्रास्ट्रक्चर व वीज पुरवठा कामी इन्फ्रास्ट्रक्चर तयार करणे (Behind the meter Power Supply) बाबतची सविस्तर अंदाजपत्रके सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

पी.एम.ई-बस सेवा प्रकल्प् राबविणेकामी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयामध्ये साईट नं.८०A सर्व्हे नं. १७/४/, ९३/३४ मधील १.१५ हेक्टर (११५०० स्क्वेअर मिटर) जागा आरक्षित आहे. त्यामधिल नगरचना विभागाकडिल अहवालानुसार ५३६३.५ चौ.मि. जागा महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये आहे. सदर जागे मध्ये प्रकल्प् राबविणेकामी व भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका OW.No.BNCMC/Vehicle/४७७/२०२३ दिनांक ०३/१०/२०२३ नुसार DPR सादर करण्यात आलेला आहे व प्रकल्पामध्ये सहभागी होणेकामी महानगरपालिके कडिल पत्र क्रमांक जा.क्र.भिनिशमनपा/वाहनविभाग /४९१/ २०२३ दिनांक १०/१०/२०२३ नुसार मनपाने समंती दिलेली आहे. मा.ॲडिशनल सेक्रेटरी,भारत सरकार गृहनिर्माण व शहरीविकास मंत्रालय यांची दिनांक ०१/११/२०२३ रोजीची व्हिडिओ कॉन्फरन्स नुसारच्या बैठकित मान्यता देण्यता आली आहे.

पी.एम.ई-बस सेवा प्रकल्पाकरिताच्या मार्गदर्शक सूचना नुसार बसडेपो इन्फ्रास्ट्रक्चर कामी प्रकल्प् किंमतीच्या ६०% निधी केंद्रीय अर्थसहाय्य् (Central Assistant) उपलब्ध होणार आहे. तसेच ई बस सेवा , ई बस चार्जिंग करिता उच्चदाब वीजपूरवठा कामी Behind the meter Power Infrastructure करिता १००% इतके केंद्रीय अर्थसहाय्य् देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाकरिता केंद्रशासनाकडून इलेक्ट्रिक बसेस तसेच त्या चालविण्यासाठी ऑपरेटर, चार्जर इत्यादी पुरविण्यात येवून PPP मॉडेलवर आधारित १० वर्षापर्यंत Convergen Energy Services Ltd.(CESL) या केंद्र शासनाच्या अंगीकृत कंपनी मार्फत परिचलन करण्यात येणार आहे.

महानगरपालिकेकडे महानगरपालिकेची परिवहन सुविधा नसल्याने मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (MMR) क्षेत्रातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बससेवा भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर या शहरांमध्ये स्वतंत्र प्राधिकरणाच्या तयार करून परिवहन महामंडळामार्फत Sepcial Purpose Vehicle (SPV) मार्फत परिवहन सेवा चाविण्याकरिता प्रशासकिय ठराव क्रमांक ८४ दिनांक २३/०१/२०२३ नुसार मंजूरी देण्यात आलेली असून प्रस्ताव शासनाकडे KDMC परिवहन मार्फत सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर शासनाकडे मंजूरी करिता कार्यवाही सुरू आहे. पी.एम.ई-बस सेवा प्रकल्प् ही परिवहन उपक्रम प्राधिकरणा (SPV) मार्फत चालविणे महानगरपालिकेला फायदेशिर आहे.

मा.ॲडिशनल सेक्रेटरी,भारत सरकार गृहनिर्माण व शहरीविकास मंत्रालय यांची दिनांक ०१/११/२०२३ रोजीची व्हिडिओ कॉन्फरन्स (बैठक) नुसार पी.एम.ई-बससेवा प्रकल्पास केंद्रशासनाकडून मान्यता देण्यात आलेली असून भारत सरकार गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय यांच्याकडिल दिनांक २०/११/२०२३ नुसार बसडेपो इन्फ्रास्ट्रक्चर व चार्जिंग स्टेशन करिता उच्चदाब वीज पूरवठा करणेकामी ६ M.W. (६००० किलोवॅट) विद्युत भाराची व्यवस्था करणेकामी Behind the meter Power Infrastructure तयार करण्याबाबतची अंदाजपत्रके राज्यशासन मार्फत केंद्रशासना कडे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. मा.ॲडिशनल सेक्रेटरी,भारत सरकार गृहनिर्माण व शहरीविकास मंत्रालय यांची दिनांक ०१/११/२०२३ रोजीची व्हिडिओ कॉन्फरन्स (बैठक) नुसारच्या VC मिटिंग मध्ये महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली बस डेपोची जागा (११,५०० पैकी ५३६३.५ चौ.मि) हि १०० ई बसेस डेपो करिता कमी पडणार असून अतिरीक्त् जागेची व्यवस्था करणेबाबत अतिरीक्त् सचिव केंद्रीय गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय यांनी सूचना केल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक २०३ जकात नाक्याकरिता आरक्षित जागा (क्षेत्रफळ ४४४३ चौ.मि.) महानगरपालिकेच्या ताब्यात असून, दिनांक १२/१०/२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या सुधारित विकास योजनेमध्ये मंजूर विकास आरक्षण क्रमांक २०३ जकात नाका या आरक्षणा खालील जमिन आरक्षण क्रमांक २५९ ट्रक टर्मिनल याप्रयोजना करिता दर्शविलेली आहे. त्याऐवजी बसडेपो करिता आरक्षित करिता दर्शविण्याबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांच्याकडे हरकत सुचना नोंदविण्यात आलेली आहे.

पी.एम.ई-बस सेवा प्रकल्पाकरिता बसडेपो इन्फ्रास्ट्रक्चर व Behind the meter Power Infrastructure करिता महानगरपालिका विकास आराखडयातील आरक्षित भूखंडावरील ५३६३.५ चौ.मि. जागा अपुरी पडणार असल्याने प्रस्तुत प्रकरणी VC मध्ये प्राप्त् झालेले निर्देश व नगरविका विभागाकडिल अभिप्राय विचारात घेता आरक्षण क्रमांक ८०A सर्व्हे नं. १७/४/, ९३/३४ मधील १.१५ हेक्टर ११५०० स्क्वेअर मिटर जागेपैकी मनपा ताब्यात असलेली ५३६३.५ चौमि. जागे मध्ये बसपार्किंग व आरक्षण क्रमांक २०३ जकात नाका येथे ई चार्जिग स्टेशन व पॉवर सबस्टेशन सहित ई बस डेपो उभारणे संयुक्तिक राहिल. परंतु सदर जागेवर प्रकल्प् राबविणेपूर्वी आरक्षण मधिल Purpose बदली करून बसडेपो आरक्षण करणे आवश्यक आहे.

पी.एम.ई-बस सेवा प्रकल्पाकरिता बसडेपो इन्फ्रास्ट्रक्चर करिता बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यानुसार रक्कम रुपये १८,४६,२६,१०५/- (१८४६ लक्ष) खर्च प्रस्तावित केलेला आहे. ई-बस चार्जिंग स्टेशन करिता ६ M.W. क्षमतेचा वीज भाराकरिता EHV Sub-Station ते बस डेपो पर्यंत २२K.V. उच्चदाब पॉवर सप्लाय कामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक वीजपुरवठा कंपनी टोरंन्ट पॉवर कंपनी यांनी Annexure १ रुपये १०,७०,४२,४४८/-(१०७०.४२ लक्ष) रक्कमेचे सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकात H.T. Supply Point नंतरचा इन्फ्रास्ट्रक्चर उदा. Distribution Transformers, RMU's, L.T. Panel, H.T. Cable, L.T. Cable, Internal supply arrangement इत्यादी बाबींचा समावेश ग्राहकांच्या (Consumer Scope)कक्षेत येत असल्याने अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदर कामाचे H.T. Supply Point पासून ते सबस्टेशन उभारणे कामांचे स्वतंत्र अंदाजपत्रक महानगरपालिकेने तयार केलेले असून Annexure२ नुसार अंदाज रक्कम रुपये ५,४७,६३,६२३/- (५४७.६३ लक्ष) खर्च येणार आहे. अंदाजपत्रके खालीलप्रमाणे आहेत.

| Estimate For E- Bus Depot Infrastructures | | |
|---|---|---|
| **Sr.No.** | **Name of Work** | **Estimate Cost** |
| 1 | Estimate for Civil & related Infrastructure work for PM E-Bus depot at site no.80A survey no.17/4,93/34 | 18,46,26,105/- (1846.26 lacs) |

| | | |
|---|---|---|
| | **Estimate for Behind the meter Power Infrastructure** | |
| 2 | Estimate for giving fresh 22kv HT Power supply of 6 MW to proposed electric bus charging station. For behind the meter Power Infrastructure work. | 10,70,42,448/- (1070.42 lacs) |
| 3 | Estimate for substion, Distribution Transformers, RMU's, H.T. Cable L.T. Panel, H.T. Cable, L.T.Cable Internal supply arrangement etc. For behind the meter Power Infrastructure work. | 5,47,63,623/- (547.63 lacs) |
| | **Total Estimate cost 1+2+3** | **34,64,32,176/- (3464.32lacs)** |

सदर कामी एकूण अंदाजे रक्कम रुपये ३४,६४,३२,१७६/- खर्च प्रस्तावित असून सदर कामाची सविस्तर अंदाजपत्रके महाराष्ट्र शासनामार्फत केंद्रसरकार मान्यतेकरिता सादर करावयाची आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ ) तरतुदी नुसार अधिकार मा. आयुक्त् तथा प्रशासक यांना आहेत. त्यानुसार वरिल प्रमाणे प्रस्ताव मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे.

**ठराव** 282

**दिनांक** 23/09/2023

**विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात पी.एम.ई बससेवा योजना राबविणेकामी बसडेपो करिता इन्फ्रास्ट्रक्चर वीज पुरवठा करिता इन्फ्रास्ट्रक्चर (Behind the meter power Infrastructure) बाबतची अंदाजपत्रके शासनास सादर करण्यास मंजूरी मिळणेबाबत.**

केंद्रशासनाच्या गृहनिर्माण व शहर विकास मंत्रालय अतंर्गत पी.एम.ई.बस सेवा प्रकल्प अतंर्गत सादर केलेल्या DPR ला केंद्रशासनाने मान्यता दिलेली असुन सादर प्रकल्पा अतंर्गत केंद्रशासनाचे अर्थसहाय्य् उपलब्ध होणार आहे. त्याकरिता प्रस्तावित बस डेपो बांधकाम इन्फ्रास्ट्रक्चर व ई बस चार्जिंग स्टेशन करिता उच्चदाब वीज पूरवठा कामी Behind the meter power Infrastructure करिता येणाऱ्या खर्चाची अंदाजपत्रके राज्यशासना मार्फत केंद्र शासनाकडे सादर करावयाची आहे.

पी.एम.ई-बस सेवा प्रकल्पाकरिता ई-बसडेपो बांधकाम इन्फ्रास्ट्रक्चर करिता महानगरपालिके मार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. ई-बस चार्जिंग स्टेशन करिता Behind the meter power Infrastructure ६ M.W. क्षमतेचा वीज भाराकरिता EHV Sub-Station ते बस डेपो पर्यंत २२K.V. उच्चदाब पॉवर सप्लाय कामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक वीजपुरवठा कंपनी टोरंन्ट पॉवर कंपनी यांनी सादर केलेले आहे. परंतु टोरेन्ट पॉवर कंपनीने सादर कलेल्या अंदाजपत्रकात H.T. Supply Point नंतरचा इन्फ्रास्ट्रक्चर उदा. Distribution Transformers, RMU's, L.T. Panel, H.T. Cable, L.T. Cable, Internal supply arrangement इत्यादी बाबींचा समावेश ग्राहकांच्या (Consumer Scope)कक्षेत येत असल्याने अंदाजपत्रकात समावेश करण्यात आलेला नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे सदर कामाचे H.T. Supply Point पासून ते सबस्टेशन, टान्सफॉरमर इत्यादी Behind the meter Power Infrastructure कामांचे स्वतंत्र अंदाजपत्रक महानगरपालिकेने तयार केलेले आहे. पी.एम.ई-बस सेवा

प्रकल्पा अतंर्गत करावयाच्या इन्फ्रास्ट्रक्चरच्या कामांची केंद्र शासनाकडे सादर करावयाची अंदाजपत्रके खालील प्रमाणे आहेत.

| Estimate For E- Bus Depot Infrastructures | | |
|---|---|---|
| **Sr.No.** | **Name of Work** | **Estimate Cost** |
| 1 | Estimate for Civil & related Infrastructure work for PM E-Bus depot at site no.80A survey no.17/4,93/34 | 18,46,26,105/- (1846.26 lacs) |
| | **Estimate for Behind the meter Power Infrastructure** | |
| 2 | Estimate for giving fresh 22kv HT Power supply of 6 MW to proposed electric bus charging station. For behind the meter Power Infrastructure work. | 10,70,42,448/- (1070.42 lacs) |
| 3 | Estimate for substion, Distribution Transformers, RMU's, H.T. Cable L.T. Panel, H.T. Cable, L.T.Cable Internal supply arrangement etc. For behind the meter Power Infrastructure work. | 5,47,63,623/- (547.63 lacs) |
| | **Total Estimate cost 1+2+3** | **34,64,32,176/- (3464.32lacs)** |

वरिलप्रमाणे अंदाजपत्रका नुसार एकूण अंदाजे रक्कम रूपये **३४,६४,३२,१७६**/- (३४६४.३२ लक्ष) होणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावावरिल प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, उप-आयुक्त्(वाहन), अतिरीक्त् आयुक्त् यांनी केलेल्या शिफारशी नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्रक्र ७१(भाग-२)नवि-१४, दिनांक ०६/०६/२०२२ अन्व्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ(१अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पी.एम.ई-बस सेवा करिता बस डेपो इन्फ्रास्ट्रक्चर व उच्चदाब वीज पुरवठा कामी करावयाच्या इन्फ्रास्ट्रक्चर कामाची अंदाजपत्रके मंजुरी करिता राज्य् शासनाकडे व तेथून केंद्र शासनाकडे सादर करणेस मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**